**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१**
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांक: नाविमं/पउमा/673
नागपूर,
दिनांक: २०/०२/२०२३

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये
नागपूर विभाग, नागपूर ( भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली, गोंदिया.)

विषय:- फेब्रूवारी/मार्च-२०२३ च्या इ १० वी व इ १२ वी परीक्षेस आवेदनपत्र सादर केलेल्या विद्यार्थ्यांना शालेय शुल्क न भरणे वा अन्य कारणास्तव शाळेकडून प्रवेशपत्र उपलब्ध न होण्याच्या प्रकरणात करावयाच्या कार्यवाहीबाबत.
संदर्भ:- १.राज्य मंडळ, पुणे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-७/१३५१, दिनांक १०.०३.२०२२.
२.राज्य मंडळ, पूणे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-७/८३६ दिनांक १९.०२.२०२३.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत (इ १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ १२ वी) फेब्रूवारी/मार्च-२०२३ च्या परीक्षेसाठी मंडळाकडे परीक्षा आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांना मंडळामार्फत दिलेल्या हॉलतिकीट (प्रवेशपत्र) संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांचेमार्फत वितरीत करण्याबाबत आपणास संदर्भ क्र. २ नूसार सूचीत करण्यात येत आहे.

तथापि विद्यार्थ्यांनी शालेय शुल्क न भरल्यामूळे अथवा अन्य कोणत्याही कारणामूळे हॉलतिकीटसाठी विद्यार्थ्यांची अडवणूक केली जाणे अथवा विद्यार्थ्यांना हॉलतिकीट न देणे अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. इ १० वी व इ १२ वीच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्र (हॉलतिकीट)वितरणामध्ये अडचणी येत असल्यास त्याबाबत संदर्भाधीन सूचित केल्यानूसार कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त कार्यपध्दतीनूसार प्रवेशपत्र (हॉलतिकीट) प्राप्त करून घेतलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेस प्रविष्ट करून घ्यावेत. परीक्षा आवेदनपत्र सादर केलेला कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व संबंधिततांनी घ्यावी.

तरी उपरोक्त जोडलेल्या संदर्भ क्र १ नूसार सर्व सूचनांची काटेकोर अमंलबाजावणी करून त्याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास कळविण्यात यावे, याची नोंद घ्यावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ नागपूर

सोबत: संदर्भाधीन पत्राची प्रत एकूण एक पृष्ट.

**प्रत माहीतीस्तव:**

१. सचिव, राज्य मंडळख पुणे यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
२.शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.

**प्रत आवश्यक पुढील कार्यवाहीस्तव:**

१. शिक्षणाधिकारी ( माध्यमिक) जि.प.भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली, गोंदिया,यांनी आपल्या अधिनस्त सर्व गट शिक्षणाधिकारी,मुख्याध्यापक/प्राचार्य, केंद्र परिरक्षक, केंद्रसंचालक यांना आपल्या स्तरावरून सूचना देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.
२.सर्व केंद्र परिरक्षक, परिरक्षण केंद्र, नागपूर विभाग, नागपूर यांना माहिती तथा कार्यवाहीस्तव.
३.सर्व केंद्र संचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना माहिती तथा कार्यवाहीस्तव.